# अर्थपूर्ण

जून २०१३ | ₹४०
पुणे, वर्ष ३, अंक ०६

आर्थिक साक्षरता + पारदर्शकता = स्वाभिमानी भारत

## एलबीटी नकोच बीटीटी हवा!

## चंद्राबाबू सरसावले, महाराष्ट्र गप्प का?

## भारतीय शेतीचे उरफाटे अर्थकारण!

# अर्थपूर्ण

**मुख्य संपादक : यमाजी मालकर**

**संपादक : प्रसाद मिरासदार**

**सहसंपादक : सम्राट शिरवळकर**

editor.arthapurna@gmail.com

**'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.**
१०४ निलगिरी अपार्टमेंटस्, दुसरा मजला,
कर्वे रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८
**फोन : ०२०- ३२६००९९६**
www.arthapurna.org

जून २०१३

वर्ष तिसरे
अंक सहावा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्,
पुणे ९८८१०९८०१०

**मुद्रितशोधन :** विजय जोशी

**जाहिरात संपर्क**
राजन मिडिया स्टेशन,
बी १, यशोराम अपार्टमेंट,
४३६-ए, नारायण पेठ,
पत्र्यामारुती गल्ली,
पुणे-४११०३०
फोन ०२०-३०२९२४४४,
३०२९२४४५
rajanmediastation@gmail.com,
myrajanmediastation@gmail.com

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी व्यवहारासाठी संपर्क:**
०२०-३२६००९९६
९९२३३३९९३३
arthapurna.monthly@gmail.com



'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील मजकुराची सत्यता पडताळून आणि योग्य शहानिशा करूनच वाचकांनी जाहिरातीबाबत कोणतेही व्यवहार करावेत. जाहिरातीत केलेल्या दाव्यांबाबत 'अर्थपूर्ण' कोणत्याही प्रकारची हमी घेत नाही.

गुंतवणुकीसंबंधी सर्व लेख समज वाढवण्यासाठी प्रसिद्ध केले जातात. त्यांस गुंतवणुकीसंबंधी सल्ला मानू नये. प्रसिद्ध केलेल्या माहितीवर आधारित कोणताही व्यवहार स्वतःच्या जबाबदारीवर करावा. 'अर्थपूर्ण' व सदर लेखक त्यासंबंधीची कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाहीत.


# अनुक्रमणिका


०५ **महाराष्ट्र गप्प का ?...**यमाजी मालकर

०६ **एलबीटी ही बीटीटीची सुरुवात ठरो...**यमाजी मालकर

०८ **तिढ्यातून पिकवण्याचा मार्ग...**सुधाकर जाधव

१३ **पायावर धोंडा मारणारी कृषिनीती...**अमित नारकर

१८ **उसात मुरतंय पाणी...**हिमांशू ठक्कर

२१ **कृषी विकास - आव्हानांचे पीक...**डॉ. सुभाष पाटील

२३ **शेतीची लढाई अर्थकारणाने बिघडवली...**सुनील चव्हाण

२६ **ताजी भाजी : रास्त दरात थेट दारात...**सुरेश कोडीतकर

२८ **ऑनलाईन मार्केटिंग शेतीसाठी वरदान!...**हेमंत गवंडे

३२ **कुरियरवाला आयकॉन : पाळंदे कुरियर्स...**नितीन ब्रह्मे

३६ **दुष्काळात एल.बी.टी. महिना...**प्रसाद मिरासदार

३७ **लोगोंसे भरवाओ टॅक्स (एलबीटी) ...**रवींद्र तांबोळी

३८ **रिमझिम खर्च...**विजय तरवडे

४० **आता वेध 'इन्कम टॅक्स रिटर्न'चे!...**यशराज

४२ **म्युच्युअल फंडः भूलभुलय्या आणि कलर कोड...**अरविंद जी. देशमुख

४६ **ट्रेडिंगमधील रिस्क आणि रिवॉर्ड ...**संदीप साठे



'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२,साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले. **मुख्य संपादक : यमाजी मालकर**

भूमिका

# एलबीटी ही बीटीटीची सुरुवात ठरो



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**एलबीटी, टोलनाके आणि भविष्यात येऊ घातलेल्या करांना विरोध केलाच पाहिजे, मात्र सार्वजनिक कामांसाठी आणि सरकार चालविण्यासाठी आपण काय पर्याय सुचवितो, यावर त्या विरोधाची किंमत ठरणार आहे. त्यातला एक पर्याय अर्थक्रांतीने सुचविला आहे. व्यापारी, बदल हवा असे म्हणणारे समूह, राजकीय नेते आणि जागरूक व्यक्तींमध्ये हे स्वीकारण्याचा खुलेपणा आहे की त्यांना बदलाचा नुसता आव आणायचा आहे ?**

एलबीटी म्हणजे स्थानिक संस्था कराच्या निमित्ताने करांविषयी गेले दोन महिने जे मंथन झाले, ते स्वागतार्ह आहे. व्यापाऱ्यांनी आपल्या परीने या कराला विरोध करून पाहिला. कर रद्द होणार नाही, हे त्यांनाही माहीत होते. सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिजोरीत कररूपाने कितीही पैसा भरला तरी ती तिजोरी कधीच भरत नाही, हेही सर्वांना माहीत आहे. त्यामुळेच टोलनाक्यावर वसूल केला जाणारा ३३वा कर बहुतांश लोक शांतपणे किंवा काही जण एखादी शिवी हसडून भरतात आणि हा विषय तेथेच सोडून देतात. काही पक्षांनी त्याचे राजकीय भांडवल करून पाहिले मात्र त्यांनाही माघार घ्यावी लागली. आपण कधी सत्तेवर आलोच तर टोलचा आधार घेतल्याशिवाय आपण कामे करू शकणार नाही, हेच त्यांना मान्य करावे लागले.

आज सर्वांत महत्त्वाचा मुद्दा काय आहे पहा. सर्वांना चांगले आयुष्य जगायचे आहे आणि ते केवळ चार भिंतींत कदापि मिळू शकत नाही. ते मिळते खऱ्या अर्थाने सार्वजनिक जीवनात. सार्वजनिक जीवन समृद्ध होण्यासाठी समाजात आजच्यासारखी अधाशी खावखाव असून चालत नाही. आपल्या वैयक्तिक समृद्धीतील वाटा कररूपाने सार्वजनिक संस्थांना दिला तरच त्या चांगले काम करू शकतात. सरकार किंवा अशा संस्था सक्षम असाव्या लागतात, लाचार असून अजिबात चालत नाही. आज आपल्या बहुतांश संस्था लाचार आहेत. त्यांच्याकडून लोकांच्या अपेक्षा तर खूप आहेत, मात्र त्या पूर्ण होण्याची सुतराम शक्यता नाही. त्यामुळे या संस्थांना बदनाम करण्याचा सोपा मार्ग आपण निवडला आहे. आपल्याला हेही माहीत आहे की या संस्था जे काम करतात, ते काम दुसरे कोणी करू शकत नाही. त्यांना सक्षम करण्याशिवाय आपल्यासमोर पर्याय नाही आणि सक्षम करण्याचा सर्वांत परिणामकारक मार्ग आहे चांगले प्रशासन. चांगल्या प्रशासनाचा मार्ग जातो आर्थिक स्वातंत्र्याच्या वाटेने. जी वाट आज रोखली गेली आहे. केवळ सार्वजनिक संस्थाच नव्हे तर सार्वजनिक जीवनाची जी हेळसांड आज पाहायला मिळते आहे, तिचे कारण संपत्तीचे केंद्रीकरण हाच आहे. हे केंद्रीकरण टाळण्याचा सर्वमान्य मार्ग एकच आहे आणि तो म्हणजे आदर्श करपद्धतीच्या माध्यमातून आपापला वाटा देऊन आपली जबाबदारी पार पाडणे.

जी जबाबदारी सर्वांची ती कोणाचीच नाही, याचा अनुभव आपण नेहमीच घेतो. त्यामुळेच तर माणसाला सरकार आणि सार्वजनिक व्यवस्था तयार कराव्या लागल्या. मानवी जीवन समृद्ध होते, याचाच अर्थ मुळी ते समाजाच्या बरोबरीने फुलते असा आहे. एखाद्या व्यवस्थेत काही मोजक्याच माणसांचे जीवन फुलताना दिसते तेव्हा त्याला कोणी मानवी विकास म्हटलेले नाही. म्हणूनच विचारी माणसांनी राजेशाही, हुकूमशाहीचा त्याग केला. गुलामगिरीला नाकारले. बहुजनांच्या हिताचा विचार करणारी कम्युनिस्ट राजवट किंवा

साम्यवाद जेव्हा मूळ विचारांपासून ढळला तेव्हा मानवाने तोही नाकारला आणि अखेर आजच्या लोकशाहीला जवळ केले. सर्वसामान्य माणसाला आवाज देणाऱ्या लोकशाहीने मानवी विकासाचा पुढील टप्पा गाठला हे खरे असले तरी भांडवलावर आधारित लोकशाही संपत्तीचे केंद्रीकरण रोखू शकलेली नाही. आज आपण राजकीय विचार म्हणून लोकशाहीत जगत असलो तरी ती खरी लोकशाही नाही, हे सर्वांनाच माहीत आहे. त्या दिशेने जाण्याचा खरा मार्ग आहे सर्वांच्या जीवनाचे नियंत्रण करणाऱ्या पैशांचे समन्यायी व्यवस्थापन. आणि हे व्यवस्थापन करण्याचा सर्वांत सोपा, चांगला, सर्वांना न्याय देणारा आणि सर्वमान्य मार्ग आहे आदर्श करपद्धती. त्याविषयीचे भान मात्र अजूनही येताना दिसत नाही. 'एलबीटी'मुळे ते येणार असेल तर एलबीटी विरोधातील आंदोलनाचे स्वागत केले पाहिजे.

### अशी असावी आदर्श करप्रणाली

जगाला आज एका आदर्श करप्रणालीची गरज आहे. आदर्श करप्रणालीमध्ये समता (इक्विटी), उत्पादकता (प्रॉडक्टिव्हिटी), सोपेपणा (सिम्प्लिसिटी), लवचिकता (इलॅस्टिसिटी), निश्चितता (सर्टंटी) आणि किफायतशीरपणा (इकॉनॉमी) या तत्त्वांची काळजी घेतलेली असावीच लागते. मात्र या तत्त्वांचा अभाव असलेल्या करपद्धतीमुळेच सध्याचा गोंधळ माजला आहे. आद्य अर्थतज्ज्ञ कौटिल्य यांनी आदर्श करपद्धती कशी असावी, हे फार सुंदर उदाहरण देऊन सांगितले आहे. ते म्हणतात, ' फुलपाखरे फुलांवर बसून जसे आणि जेवढे परागकण जमा करतात, तसा सरकारने कर जमा केला पाहिजे. म्हणजे पराग तर मिळालेच पाहिजेत पण फुलांना इजाही होता कामा नये.'

मात्र आमचे जळायला लागले म्हणून आम्ही ओरडायला लागलो, आम्हांला एकूण करपद्धतीविषयी काहीच म्हणायचे नाही, असे जर व्यापारी वर्ग म्हणणार असतील तर हे आंदोलन अगदीच संकुचित ठरते. बुडायला लागलेल्या जहाजाचे पाणी जोपर्यंत मला वेढा घालत नाही, तोपर्यंत व्यवस्थेविषयी मी काही बोलणार नाही, ही वृत्ती अतिशय मागास, संकुचित आणि कातडीबचावू ठरते. आज तरी समाजातील संघटित समूह आणि या व्यवस्थेचा फायदा घेऊन पैसा मिळविणारे बहुतांश त्याच दिशेने विचार करताना दिसत आहेत.

सध्याच्या समाजातील विषमता, अनेक विसंगती आणि अव्यवस्थेला व्यवहार्य उत्तर म्हणून अर्थक्रांती प्रतिष्ठानने जे पाच प्रस्ताव जगासमोर ठेवले आहेत त्याची जग आता दखल घ्यायला लागले आहे.

(अमेरिकेतील फोर्डहॅम युनिव्हर्सिटीचे प्रो. एच. डी. विनोद यांच्या 'हिंदू इकॉनॉमिक्स अँड बिझिनेस' या ग्रंथात 'अर्थक्रांती' प्रस्तावांची मोठी दखल नुकतीच घेण्यात आली आहे.) अर्थक्रांतीने आयात निर्यात (कस्टम) कर वगळता सर्व ३१ करांना एकच कर सुचविला आहे. त्याचे नाव बीटीटी. म्हणजे बँक ट्रँझॅक्शन टॅक्स. बँकेत ज्याच्या नावावर पैसा जमा होईल, त्या खात्यातून हा कर विशिष्ट टक्क्यांनी (उदा. २%) कापून घेतला जाईल. त्या रकमेचे वाटप केंद्र, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि हा व्यवहार संगणकाने पूर्ण करणारी बँक असा चार संस्थांच्या नावावर लगेच जमा केला जाईल. शेअर बाजारात जसा संगणकीकृत व्यवहार चालतो




तसे. सार्वजनिक कामासाठी आणि सरकार चालविण्यासाठी लागणारा पुरेसा कर तर याद्वारे जमा होईलच मात्र त्याचे ओरखडे करदात्याला जाणवणार नाहीत, अशी ही पद्धत असेल. आदर्श करपद्धतीत समता, उत्पादकता, सोपेपणा, लवचिकता, निश्चितता आणि किफायतशीरपणा असावा लागतो. जगाने मान्य केलेले सर्व निकष ही पद्धती पूर्ण करेल.

एलबीटीला व्यापाऱ्यांचा विरोध योग्यच आहे. मात्र अशा आदर्श करपद्धतीचा पुरस्कार ते करतात काय, हा खरा कळीचा प्रश्न आहे. एलबीटी, टोलनाके आणि भविष्यात येऊ घातलेल्या करांना विरोध केलाच पाहिजे, मात्र सार्वजनिक कामांसाठी आणि सरकार चालविण्यासाठी आपण काय पर्याय सुचवितो, यावर त्या विरोधाची किंमत ठरणार आहे. त्यातला एक पर्याय अर्थक्रांतीने सुचविला आहे. व्यापारी, बदल हवा असे म्हणणारे समूह, राजकीय नेते आणि जागरूक व्यक्तींमध्ये हे स्वीकारण्याचा खुलेपणा आहे की त्यांना बदलाचा नुसता आव आणायचा आहे ?

■